
क्र. १६५ पहिले वर्ष

०१ ऑक्टोबर २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील सव्विसावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या पहिल्या वाचनात यहेज्केल देव जो न्यायी आहे, विशेषत: दुर्जनांनी पश्चात्ताप करावा आणि नीतीने व धार्मिकतेने जीवन जगावे म्हणून लोकांना तो मार्गदर्शन करीत आहे. संत पौल आजच्या दुसऱ्या वाचनात म्हणतो, ''तुम्ही समचित्त व्हा, म्हणजेच एकमेकांवर प्रीती करा.'' आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू दोन पुत्रांचा दृष्टान्त देऊन विश्वास, धार्मिकता व पश्चात्तापी शिकवण देत आहे. धार्मिकतेचा आणि नीतिमत्तेचा बुरखा घालणाऱ्या शास्त्री परुश्यांनी योहान व ख्रिस्तावर विश्वास ठेवला नाही. मात्र पापी, जकातदार, समाजाने बहिष्कृत केलेल्या स्त्रिया व अन्यायग्रस्त गरीबांनी येशूवर विश्वास ठेऊन पश्चात्ताप केला व ते सर्वकाळचे जीवनास पात्र बनले. आपण आपला विश्वास पडताळून पाहत असताना पश्चात्तापी अंत:करणाने प्रभू येशूला शरण जाऊ या. सर्व बंधूभगिनींबरोबर समचित्त होऊन सेवा करण्यास कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे सर्वसमर्थ बापा, तुझ्या अमर्याद सामर्थ्याचे दर्शन घडते. तुझ्या प्रीतीत दानांचा आम्हांवर सतत वर्षाव कर. तू अभिवचन दिलेल्या शाश्वत जीवनाकडे वेगाने वाटचाल करण्यास व तुझ्या राज्यातील आनंदात सहभागी होण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यहेज्केल या पुस्तकातून घेतलेले वाचन १८: २५–२८**

**''दुर्जन दुष्टाईपणापासून परावृत्त होईल तर तो आपला जीव वाचवील.''**

परमेश्वराचे वचन मला याप्रमाणे प्राप्त झाले : तुम्ही म्हणता, प्रभूचा मार्ग न्याय नाही. हे इस्राएल घराण्या, ऐक माझा मार्ग न्याय नाही काय? तुमचेच मार्ग न्याय नाहीत, असे नव्हे काय? कोणी धार्मिक आपली धार्मिकता सोडून दुष्कर्म करतो आणि त्यामुळे मरतो तर तो आपण केलेल्या दुष्कर्मानेच मरतो. दुर्जन आपण केलेल्या दुष्टाईपणापासून परावृत्त होऊन नीतीने आणि धार्मिकतेने वागेल तर आपला जीव वाचवील. तो आपण केलेली सर्व पापे लक्षात आणून वळेल तर तो खात्रीने वाचेल. मरणार नाही.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**२४:४–५, अब, ६–७, ८–९**

प्रतिसाद: **हे परमेश्वरा, तुझे मार्ग मला दाखव.**

१. तुझा वाटा मला प्रगट कर. तू आपल्या सत्पथाने मला ने, मला शिक्षण दे, कारण तूच माझा उध्दारक देव आहेस.

२. हे परमेश्वरा, तू आपली दया आणि वात्सल्य आठव. ती पुरातन काळापासून आहेत. हे परमेश्वरा, माझी तारुण्यातली पापे व अपराध आठवू नकोस. तू आपल्या वात्सल्यानुसार माझे स्मरण कर.

३. परमेश्वर उत्तम आणि सरळ आहे, म्हणून तो पाप्यांस सन्मार्ग दाखवतो, तो नम्र जनांस न्यायपथाला लावतो, तो दीनांस आपला मार्ग शिकवतो.

### दुसरे वाचन

**पौलचे फिलिप्पैकरांस पत्र यातून घेतलेले वाचन २:१–११**

**''अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो.''**

*(ख्रिस्ताच्याठायी काही आश्वासन, प्रीतीचे काही सांत्वन, आत्म्याची काही सहभागिता, काही कळवळा आणि करुणा ही जर आहेत, तर तुम्ही समचित्त व्हा, म्हणजे एकमेकांवर सारखीच प्रीती करा आणि एकजीव होऊन एकचित्त व्हा, अशाप्रकारे माझा आनंद पूर्ण करा. तट पाडण्याचा अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुध्दीने काहीही करू नका, तर विनयशीलतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो.) तो देवाच्या स्वरुपाचा असूनही देवाच्याबरोबरीचे असणे हे लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले. म्हणजे मनुष्याच्या प्रतिरुपाचे होऊन दासाचे स्वरुप धारण केले आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण आणि तेही क्रूसावरचे मरण सोसले. येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वत:ला लीन केले ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नामापेक्षा जे श्रेष्ठ नाम ते त्याला दिले, ह्यात हेतू हा की, स्वर्गात पृथ्वीवर, आणि पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नामाने टेकला जावा आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ८:१२**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील,

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २:२८–३२**

**''पहिल्या मुलाला पश्चात्ताप झाला आणि तो गेला. जकातदार आणि वेश्या मुख्य याजक व वडीलजन यांच्या आधी देवाच्या राज्यात जातात.''**

येशू मुख्य याजक व लोकांचे वडीलजन यांना म्हणाला, तुम्हास काय वाटतेते सांगा. एका मनुष्याला दोन मुलगे होते. तो पहिल्याकडे जाऊन म्हणाला, मुला, आज द्राक्षमळ्यात जाऊन काम कर. पण तो

म्हणाला, 'मी नाही जात.' ती नंतर त्याला पश्चात्ताप होऊन तो गेला. मग दुसऱ्याकडे जाऊन त्याने तसेच म्हटले. त्याने उत्तर दिले, 'जातो महाराज' पण तो गेला नाही. ह्या दोघातून कोणी बापाच्या इच्छेप्रमाणे केले? ते म्हणाले, पहिल्या मुलाने येशूने त्यांस म्हटले, मी तुम्हास नक्की सांगतो, जकातदार आणि वेश्या तुमच्याआधी देवाच्या राज्यात जातात. कारण योहान नीतीच्या मार्गाने तुम्हाकडे आला आणि तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला नाही, जकातदार व वेश्या ह्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. पण हे पाहून तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवावा असा नंतरही तुम्हाला पश्चात्ताप झाला नाही.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू**

प्रभू येशू ख्रिस्ताचे प्रेम आपणास विश्वासामध्ये एकत्र आणते. ज्यामुळे आपल्या बाप्तिस्म्याचे आणि त्याच्याबरोबर जोडलेल्या मिशनचे नूतनीकरण होते. देवावरील श्रध्देमुळे आपल्या सर्व विनंत्या आपण त्याच्या चरणापाशी अर्पण करू या.

आपला प्रतिसाद – **प्रभो, आमची प्रार्थना ऐक!**

१. आपले पोप, फ्रान्सिस, सर्व बिशप्स, व धर्मगुरू ह्यांनी निर्भिडपणे आजच्या जगात प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता घोषित करावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. आपल्या अखिल विश्वव्यापी ख्रिस्तसभेसाठी, जिच्याद्वारे जगाला आशीर्वाद मिळावा आणि जास्तीत जास्त लोकांना देवावरील खऱ्या विश्वासाचा आनंद लाभावा, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. सर्व मिशनऱ्यांसाठी, जे कठीण परिस्थितीत मिशनचे कार्य करीत आहेत, त्यांनी संकटामुळे कधीही हार मानू नये आणि विशेषकरून ज्यांची ते सेवा करतात त्यांच्यासाठी नेहमीच ते आशेचे चिन्ह बनावे, म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. सर्व तरुण तरुणींसाठी, चर्चमध्ये सेवाकार्य करण्याची त्यांच्यात आवड निर्माण व्हावी आणि देवाने दिलेल्या पाचारणास त्यांनी धैर्याने प्रतिसाद द्यावा, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. क्षणभर शांत राहून आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रार्थना करू या (१० सेकंद शांतता)... **आपला प्रतिसाद.**

**धर्मगुरू**

हे प्रेमळ आणि दयाळू परमेश्वरा, तुझ्या एकुलत्या एक पुत्राला तू आम्हामध्ये मार्ग, सत्य व जीवन म्हणून पाठविलेस. आमची प्रार्थना ऐक, की आम्ही न्याय, करुणा आणि सत्य मार्गाने तुझ्या पुत्राचे बारकाईने अनुकरण करावे व जगाला तुझा प्रेम संदेश सांगावा. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे दयाळू परमेश्वरा, आमच्या समर्पणाचा स्वीकार कर. आणि त्याच्याद्वारे आम्हावर तुझ्या कृपेचा वर्षाव कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या बलिदानात आम्ही ख्रिस्ताचा मृत्यू घोषित करतो. या बलिदानाद्वारे आम्हांला मुक्तीचे दान दे व ख्रिस्ताच्या वैभवात आम्हाला सहभागी कर. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## चिंतन

चांगला माणूस जसा बिघडू शकतो तसाच वाईट माणूस चांगला बनू शकतो. दरम्यानच्या काळात त्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार व केलेल्या कृतीनुसार त्याच्या जीवनाची एकंदरीत दिशा ठरू शकते. आजच्या पहिल्या वाचनात धार्मिक व दुर्जन, दुसऱ्या वाचनात आज्ञाधारक व बंडखोर, तर शुभवर्तमानात विश्वासू व अविश्वासू ह्या व्यक्तींनी उदाहरणे देण्यात आलेली आहेत. त्यामागची पार्श्वभूमी जर आपण समजून घेतली तर आपल्याला पुढील विचार चिंतनाखाली मिळतात.

**(१) धार्मिकता जीवन देते; दुष्टपणा विनाशाकडे घेऊन जातो :** यहेज्केलच्या काळातील लोक आपल्या जीवनाच्या अवस्थेचे खापर आपल्या पूर्वजांच्या दुष्टपणावर फोडीत होते. आमच्या बापांनी द्राक्षे खाल्लीत म्हणून आमचे दात आंबले असे ते म्हणत. यहेज्केल त्यांना आपल्या कृत्यांची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करतो. धार्मिक माणसाने चुकीचा निर्णय घेतला तर तो विनाशाया दिशेने जाऊ शकतो तसाच दुर्जनाने चांगला निर्णय घेतला तर तो जीवनाचा आस्वाद घेऊ शकतो. मात्र त्यासाठी त्याने स्वातंत्र्याचा सदुपयोग करायला हवा.

**(२) नम्रता माणसाला उंचावते; गर्वाचे घर खाली असते :** आजचे दुसरे वाचन आपल्यासमोर प्रभू येशूच्या त्यागाचे व नम्रतेचे उदाहरण सादर करते. तो देवाच्या बरोबरीचा असूनही गर्विष्ठ बनला नाही. याउलट ज्यांच्या हाती तात्पुरती राजकीय व धार्मिक सत्ता होती त्यांनी त्याला क्रूसावर खिळले. त्याच्या पुनरुत्थानामुळे गर्विष्ठांचे घर खाली झाले मात्र येशूच्या नावापुढे गुडघे टेकले जावेत इतका तो आकाशाएवढा उंच झाला.

**(३) पश्चात्ताप माणसाला नवजीवन देतो; पाप माणसाला मरणाकडे घेऊन जाते :** आजच्या शुभवर्तमानातील पहिला मुलगा हे यहुदी लोक, शास्त्री-परुशी ह्यांचे प्रतीक आहे. त्यांनी परमेश्वराची आज्ञा पाळण्याचे वचन दिले होते परंतु प्रत्यक्षात मात्र ते देवाच्या इच्छेविरुध्द वागले होते. याउलट जकातदार व कसबिणी (वेश्या) ह्यांनी आज्ञाभंगाचे जीवन स्वीकारलेले होते. मात्र नंतर त्यांना पश्चात्ताप झाला व ते नवजीवन जगू लागले. प्रभू येशू हा तिसरा मुलगा होय. त्याने 'होय' म्हटले आणि त्याप्रमाणे केले.

**आत्मपरीक्षण :** आपल्या जीवनात पहिला मुलगा (आज्ञाभंग), दुसरा मुलगा (पश्चात्ताप) आणि तिसरा मुलगा (आज्ञाधारकपणा) कोणकोणत्या क्षेत्रात कार्यरत आहेत? आपली वाटचाल धार्मिकतेकडे नवजीवन सुरू आहे की दुष्टपणाकडे (विनाश) सुरू आहे?

●●●

| ऑक्टोबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०२ | रक्षक दूत (पां) | : जखऱ्या ८:१-८/लूक ९:४६-५० |
| मंगळ ०३ | सं थिओडोर ग्वेरिन (हि) | : जखऱ्या ८:२०-२३/लूक ९:५१-५६ |
| बुध ०४ | असिसिचे सं फ्रान्सिस (पां) | : नहेम्या २:१-८/लूक ९:५७-६२ |
| गुरू ०५ | सं प्लासिड (हि) | : नहेम्या ८:१-१२/लूक १०:१-१२ |
| शुक्र ०६ | सं ब्रुनो (हि) | : बारुख १:१५-२२/लूक १०:१३-१६ |
| शनि ०७ | जपमाळेची पवित्र मरिया (पां) | : बारुख ४:५-१२, २७-२९/लूक १०:१७-२४ |